

# संतांच्या श्रेष्ठ कथा

## भाग २

सुमेधा कुलकर्णी

परी प्रकाशन

संतांच्या श्रेष्ठ कथा
भाग २

© सुरक्षित

प्रकाशक :
परी प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

प्रमुख वितरक
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

मुखपृष्ठ :
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

मुद्रक :
जयंत प्रिंटरी

आवृत्ती :
२९ ऑगस्ट, २०१३

किंमत :
रुपये १२०/-

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | संत तुलसीदास | ३ |
| २. | संत चोखामेळा | १९ |
| ३. | संत नानकदेव | ३५ |
| ४. | संत रोहिदास | ५० |
| ५. | संत कबीर | ६६ |
| ६. | संत निवृत्तीनाथ | ८३ |
| ७. | संत नरहरी सोनार | ९८ |
| ८. | संत मीराबाई | ११४ |
| ९. | संत कान्होपात्रा | १२९ |
| १०. | नामयाची दासी जनी | १४५ |



# संत तुलसीदास

आपला महाराष्ट्र जसा संत परंपरेत अग्रेसर आहे तसे आपल्या देशातील विविध भागही संतांच्या मांदियाळीत पुढेच आहेत. ज्यावेळी आपल्या भूमीत संत जन्मास आले त्यावेळी आपली राजकीय, धार्मिक, आर्थिक, सामाजिक, वैचारिक अशी सर्व प्रकारची परिस्थिती दयनीय झाली होती. कोण कुणास पुसत नव्हता. प्रत्येकजण एकमेकाची पायमल्ली करत होता. राजे लोक आपला धर्म सांभाळत नव्हते. प्रजेकडे त्यांचे दुर्लक्षच होते. आपल्या विलासात ते दंग होते.

उच्चवर्गीय अस्पृश्यांना त्रास देत होते. त्यांची सावली अंगावर पडायची नाही. त्यांनी सर्व घाण कामे करायची. नाही केली तर त्यांना शिक्षा होत होत्या. अस्मानी संकटे होतीच. दुष्काळही पडले. त्यात परकीय आक्रमणे होत राहून त्यामुळे लोक अगदी जेरीस आले होते. त्यात तर अस्पृश्यांचे जिणे बघायलाच नको. इकडून मार, तिकडून मार अशी त्यांची कोंडी झालेली होती. न घरका न घाटका अशी त्यांची स्थिती झाली होती. त्यांना कुणी वालीच राहिला नव्हता. अशा वेळी संत उदयास आले. ते मुळातच गरीब परिस्थितीतले; पण शांत, प्रेमळ स्वभावाचे. विचारी, समतोल राखून भानावर असणारे, समाजाच्या सर्व स्थरातून एक, एक संत जन्मास आले. त्यांनी सर्व परिस्थितीचा विचार केला होता. म्हणूनच त्यांनी समाजसुधारणा करून समाज उद्धाराचे काम हाती घेतले. अस्पृश्य समाजास जवळ केले. त्यांच्यात जगायची उमेद निर्माण केली. त्यांची भीती घालवली.

सर्व स्तरात जे संत निर्माण झाले त्या सर्व संतांची शिकवण एकच होती. अस्पृश्यता मानू नका. भेदभाव सोडून द्या. इतरांना गुलाम म्हणून वागवू नका. सर्वांना समान माना. कुणाचाही द्वेष, मत्सर करू नका. सर्व प्राणिमात्रांवर दया करा. सर्वांना प्रेम द्या. या जगातील सर्व जिवांना एकाच परमेश्वराने निर्माण केले आहे तर मग परमेश्वराचा आदेश डावलू नका. अंधश्रद्धा, भोळसट कल्पना, कालबाह्य रूढीपरंपरा, रीतीरिवाज यांना मूठमाती द्या हेच संतांनी सर्वांना सांगितले होते.

भागवत धर्माच्या झेंड्याखाली सर्व जातीबांधवांना एकत्र आणण्याचे काम संतांनी केले आहे. त्यांनी आपला संसार, आपले कुटुंब, पैसा-अडका, गरजा याकडे दुर्लक्ष केले आणि

समाजाची सुख–दु:खे बघितली. समाजाची दु:खे दूर होण्यासाठी संतांनी आपले देह झिजवले. तीर्थयात्रा केल्या. दु:खितांचे अश्रू पुसले. संत जर झाले नसते तर आज आपल्याला समाजाचे वेगळे चित्र बघायला मिळाले असते. पंढरीचा विटेवर उभा असलेला पांडुरंग हा सर्वांना आपल्यात सामावून घेणारा देव. त्याची भक्ती, त्याच्या नामाचा गजर यातून अस्पृश्यांना जगण्याचा साधा आणि सोपा मंत्र दिला. कर्मातून भक्ती आणि भक्तीतून मुक्ती हेही साधले.

संतांच्या परंपरेत निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव, मुक्ताई, नामदेव, जनाबाई, सावता माळी, गोरा कुंभार, सेना न्हावी, एकनाथ तुकाराम, रामदास, रोहिदास, चोखामेळा, दाभाजी, गुरू नानक, कबीर, सूरदास, नरसी मेहता, कान्होपात्रा, गाडगेबाबा अशा कितीतरी संतांची नावे सांगता येतील. कुणाची गुलामगिरी न पत्करता प्रत्येकाने कष्ट करून जगावे. माणसाला माणसाप्रमाणे वागवावे अशी शिकवण प्रत्येक संताने दिली आहे. समाजाच्या प्रत्येक स्तरातून एक, एक संत निर्माण झाला. प्रत्येकाने एकच धर्म मानला आणि तोच धर्म जगाला शिकवला. तो म्हणजे भक्ती प्रेम. सर्वांशी प्रेमाने वागा. भक्तीचा मार्ग आचरून आपले जीवन सुफलित करा असा संदेश संतांनी दिलेला आहे. माणुसकीची ज्योत प्रत्येकाच्या हृदयात लावण्याचे काम संतांनी केले. अशा या संत परंपरेतील संत तुलसीदास यांच्याविषयीच्या गोष्टीतून त्यांचे जीवनचरित्र पाहूया. ते संत या पदापर्यंत कसे पोहोचले ते पाहूया.

संत तुलसीदासांचा जन्म मध्यमवर्गीय घराण्यात झाला. घराण्यातील लोक भक्तीमार्गी असले तरी समाजातील आपली प्रतिष्ठा जपणारे होते. प्रापंचिक होते. तुलसीदासांचा जन्म वाराणसी येथे झाला. वाराणसी हे गाव गंगा नदीकाठी प्रसिद्ध तीर्थक्षेत्र म्हणून उत्तर प्रदेशातील नावाजलेले गाव. संपूर्ण गाव भक्तिमय वातावरणाने भारलेले होते. गंगेच्या काठावर कित्येक देवळे. अशा ठिकाणी तुलसीदासांचा जन्म झालेला; पण त्यांना लहान वयात म्हणावी तशी भक्तीची ओढ नव्हती. खेळावे, दंगा मस्ती करावी, मुले जमवून गंगा किनाऱ्यावर धुमाकूळ घालावा. वृद्धांची चेष्टा करावी, मुलांशी भांडणे करावी, यातच तुलसी दिवसभर रमून जात असे. थोडेफार लिहायला, वाचायला शिकला; पण मौजमजा, चैनी यातच त्याचा दिवस केव्हा मावळत असे ते कळत नसे.

त्या काळी रीतीरिवाजानुसार लहान वयात विवाह होत असत. तुलसीचे लक्ष कशातच नसायचे. घरच्यांना वाटायचे याने कामधंदा बघावा. आपली पत प्रतिष्ठा चांगला व्यापार करून, धनवान होऊन वाढवावी; पण तुलसी काही ऐकत नसे. दंगा, मारामारी यातच त्याला आनंद वाटत असे.

लहान मुले खेळत होती. तुलसी त्यांच्यात गेला. तो त्यांच्याहून मोठा होता. गरीब, श्रीमंत मुले एकाच ठिकाणी खेळत होती. हा तिथे गेला. त्याला काय वाटले कुणास ठाऊक ? एका मुलास त्याने उचलले आणि झाडाच्या फांदीस बांधून घातले. तो मुलगा रडायला लागला. खाली उभा राहून तुलसी त्याला दटावू लागला. बाकीची मुले घाबरली. कुणी जाऊन घरी सांगितले. झाडावर

फांदीला बांधलेल्या मुलाचे आई-वडील तिथे धावले. आपल्या मुलाला तुलसीने अशी शिक्षा दिलेली बघून खूप राग आला. त्यांनी वर चढून मुलास सोडवले. त्याला खाली आणले आणि तुलसीला चांगला मार दिला. तरी कशी मज्जा केली म्हणून तुलसीदास हसतच होता.

त्याच्या घरी तक्रार गेली. घरातल्या वडील मंडळींनी त्यास खूप रागावले. चार समजुतीच्या गोष्टीही सांगितल्या; पण तुलसीवर त्याचा काहीही परिणाम झाला नाही. त्याचा खोडकरपणा सुरूच होता. एकदा तर त्याने जंगलात सापडले म्हणून माकडाचे पिल्लू घरी पाळायला आणले. हा त्याचा दयाबुद्धी भाव चांगला होता; पण माकडासारखे प्राणी हे जंगलात राहणेच ठीक असते. मनुष्यवस्तीत पाळायचे ते प्राणी नव्हेत. त्याला सांगून पटेना; पण सर्वांनी त्याच्या मागे लागून ते माकडाचे पिल्लू परत त्याला जंगलात सोडायला लावले.

त्याचा असा त्रास दिवसेन् दिवस वाढतच होता. एकदा तर तो आपल्यापेक्षा लहान मुलांना घेऊन जंगलात गेला. त्यांना सोडून एका गुहेत जाऊन बसला. मुले जंगलातील वातावरणाने घाबरली. वाटसरू तिथून जात होते. त्यांना लहान मुले रडताना दिसली. त्यांनी जवळ जाऊन विचारपूस केली. मुलांनी तुलसीदासाचे नाव सांगितले; पण त्यांच्यात तुलसीदास नव्हताच.

मग त्या वाटसरूंनी तुलसीदासाचा शोध घेतला. तर तुलसीदास एका गुहेत लपून मुलांची गंमत बघून हसत होता. वाटसरूनी त्याला गुहेबाहेर काढून चांगला चोप दिला. त्या सर्वांना घेऊन वाटसरू वाराणशीत आले. चौकशी करून मुलांना त्यांच्या, त्यांच्या घरी सोडले. वाटसरू आल्या वाटेने निघून गेले. या प्रकाराने घरातील लोक अगदी त्रासून गेले. तो सुधारावा म्हणून त्याला गुरूगृहात ठेवले; पण तिथेही तो नीट राहात नव्हता. गुरुगृहात इतर ठिकाणची मुले शिकायला होती. त्यांच्याही तो खोड्या काढे. झाडावर दगडे मारून फळांची, पक्ष्यांची नासधूस करे. विहिरीवर पाणी आणायला गेलं की त्यात मुलांना ढकलून देई. त्यामुळे गुरू त्याच्यावर नाराज होते. त्यांनी त्याला घरी पाठवून दिले आणि घरच्यांना सांगितले की, याची अभ्यासात फार काही प्रगती होणार नाही. तुम्ही याचा विवाह करून द्या. त्याला प्रपंचात गुंतवा. म्हणजे तो सुधारेल. सरळ मार्गावर येईल. घरच्यांनाही ते म्हणणे पटले. चांगल्या घरातील योग्य मुलगी बघून तुलसीदासाचा विवाह केला. आता तुलसीदासाने खोड्या काढणे, त्रास देणे सोडून दिले. तो आता पत्नीमध्ये दंग झाला.

एक क्षणभरही तो पत्नीशिवाय आता राहू शकत नव्हता. जिथे तिथे त्याला पत्नी हवी असे. त्याचे हे पत्नीवेड कमालीचे झाले. एकदा काही सणानिमित्त त्याची पत्नी माहेरी गेली होती. हा इकडे एकटाच होता. त्याला पत्नीशिवाय करमेना. त्याला सारखी तिची आठवण यायला लागली. रात्र, रात्र त्याला चैन पडेना. दिवस कसा तरी काम करून घालवी; पण रात्री काय करणार ?

''फारच त्याची बेचैनी वाढली आणि तो पत्नीच्या माहेरी गेला. पत्नीचे माहेरचे घर मोठे उंच मजल्याचे होते. वरच्या मजल्यावर पत्नी निजते हे त्याला ठाऊक होते. घराचे दरवाजे बंद होते. आता पत्नीला भेटायला जायचे कसे. वरची खिडकी त्याच्या सुदैवाने उघडी होती. वर चढायला काही दुसरे साधन त्याच्याकडे नव्हते. आता काय करावे ? पत्नीला भेटायची तर त्याला फार घाई झाली होती. त्याने वर निरखून पाहिले. वरच्या खिडकीपासून त्याच्या हाताला येईपर्यंत दोर लोंबकळत होता. तो त्याला दिसला. त्याला आनंद झाला. त्या दोराला त्याने हात घातला. घट्ट दोन्ही हातांनी तो दोर पकडला आणि त्या दोराच्या सहाय्याने तो सरसर वर चढून खिडकीत पोहोचलासुद्धा. दोर भक्कम होता म्हणून तो क्षणार्धात वर पोहोचला. त्याला हायसे वाटले.

खिडकीतून आत उडी मारून तो खोलीत आला तर पलंगावर त्याची पत्नी गाढ झोपली होती. त्याला पत्नीला बघून खूप आनंद झाला. मध्यरात्र झाली होती. सगळीकडे काळाकुट्ट अंधार. वरच्या खोलीत मंद मंद समई तेवत होती. त्या उजेडात पत्नीचा चेहरा तुलसीदासाने पाहिला आणि त्याने घाईघाईने पत्नीला उठवले. ती गाढ झोपेतून उठली. ती घाबरली. भांबावली. प्रथम तिला काही कळले नाही. मग नंतर लक्षात आले. तिला आश्चर्य वाटले, एवढ्या रात्री, पती वर कसं आला ? तिने त्यास विचारले.

तुलसीदास तिला म्हणाला, ''काय करू प्रिये ! तुझ्याशिवाय अगदी चैन पडेना. म्हणून आता एवढे साहस करून तुला भेटायला आलो.''

''पण दरवाजे बंद असताना वर कसे आलात ?''

''तू एक खाली दोर सोडला होतास ना! त्याला धरून वर आलो.''

पत्नी म्हणाली, ''छे ! छे ! मी कशाला दोर खाली सोडू ? आणि मला काय माहिती की तुम्ही असे साहस करून मला भेटणार ते ? बरे आता विश्रांती घ्या. सकाळी बघू तुम्ही वर कसे आलात ते.''

सकाळ झाली. पत्नीने उठून दोर पाहिला तर तो दोर नव्हताच. एक अजस्त्र, भला मोठा, काळा–काळा साप होता आणि तो आता मेलेला होता. तो साप बघून तिला धक्काच बसला. तिने पाहिले तो साप चांगला विषारी वाटत होता. तिने घाई गडबडीने तुलसीदासाला आपल्या पतीला उठवले. त्यास तो दोर दाखवला. त्याने पाहिले तर तो दोर नसून भला मोठा विषारी साप होता. क्षणभर तो साप बघून त्याच्या अंगावर भीतीचा काटा आला; पण क्षणभरच. आपल्या या अभूतपूर्व साहसाचे त्याचे त्यालाच कौतुक वाटू लागले. अभिमान वाटू लागला. आता पत्नी आपले आपल्या या जगावेगळ्या धाडसाबद्दल कौतुक करणार असे वाटू लागले. तो उत्सुकतेने पत्नीकडे बघू लागला.

पत्नी त्याला म्हणाली, ''प्राणनाथ तुम्ही माझ्यावर तुमच्या प्राणापलीकडेही प्रेम करता आहात हे तुमच्या साहसावरून लक्षात आले. मी जशी तुम्हाला प्रिय आहे तसा परमेश्वरही तुम्हाला

प्रिय असला पाहिजे. माझ्यासाठी जसे तुम्ही संकटातून साहस करून भेटायला आलात तेच प्रेम, तीच भक्ती, तेच साहस परमेश्वर प्राप्त होण्यासाठी दाखवाल तर परमेश्वर तुम्हाला नक्कीच भेटेल. मग ते साहस तुम्ही का करून दाखवत नाही. माझ्यावर जसे तुम्ही प्राणापलीकडे प्रेम करता तसे प्रेम परमेश्वर प्राप्त करण्यासाठी करा. मग परमेश्वर तुम्हाला नक्की दर्शन देईल.''

क्षणभराचाच उपदेश. प्रिय पत्नीकडून परमेश्वर प्राप्तीविषयी उपदेश. तुलसीदासाचे मन फिरले. त्याला पत्नीविषयी वाटणारे विषयासक्त प्रेम क्षणात आटले आणि परमेश्वर मिलनाची त्याला ओढ वाटू लागली.

तो पत्नीला म्हणाला, ''प्रिये तू माझे डोळे उघडलेस. या विषयासक्त जीवनाचा पुढे मला काही उपयोग नाही. हे सगळे उपभोगाचे जीवन क्षणभंगूर आहे. आता मी इथून निघतो. तुम्हा सर्वांपासून दूर होतो. आता माझे एकच ध्येय राहील आणि ते म्हणजे परमेश्वर प्राप्ती. आता मी तुमचा कुणीही नाही. जे काही करीन ते परमेश्वरासाठी करेन. प्रभू रामचंद्र हे माझे उपास्य दैवत आहे. त्यांची भक्ती करेन. त्यांचे अमृतासमान नाम मी सदैव माझ्या ओठी ठेवीन. त्यांच्या भक्तीचा महिमा सर्वत्र पसरवेन. त्यांची कीर्ती दूरदूरवर पसरवेन. तू मला चांगला मार्ग दाखवलास. नाहीतर या विषयासक्त जीवनात मी किती काळ गुंतून पडलो असतो हेच मला कळले नसते; पण माझे भाग्य म्हण की काय! तू सुबुद्धी दिलीस. आता माझे मन पालटले. आता क्षणभरही मी इथे राहायला तयार नाही. मला निरोप दे. एक रामभक्त तुलसीदास म्हणून माझी ओळख जगाला सांगणार. लोकांना दाखवून देणार.''

प्रिय पत्नीचा निरोप घेऊन तुलसीदास तिथून बाहेर पडला आणि गंगा घाटावर रामनाम जपत बसला. त्याने तपश्चर्या केली. रामनाम अखंड स्मरून एक दैवी शक्ती त्याच्यात निर्माण झाली. त्याचे वागणे आता सामान्य मनुष्यासारखे नव्हते. थोडेसे वेडेपणाकडे झुकले होते. त्याने तीर्थयात्रा केल्या. बराचसा भारत भूप्रदेश पायी हिंडून बघितला. सगळीकडे अराजकता माजली होती. कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नव्हता. परकीय आक्रमणाने प्रजा त्रासून गेली होती. लोक विषयासक्त होऊन देव-धर्म विसरले होते. रामाचे नाव तर कुणीही घेत नव्हते.

अस्पृश्यांची परिस्थिती तर त्याहून वाईट होती. त्यांना मंदीर प्रवेश नव्हता. देवाचे दर्शन त्यांना घेण्यास सक्त मनाई होती. त्यांनी देवाची भक्ती करायची नाही. त्यांनी देवाचे नाव घ्यायचे नाही. देवाची पूजा करायची नाही. अस्पृश्यांनी इकडे-तिकडे शिवायचे नाही. इथे हात लावायचा नाही. तिथे हात लावायचा नाही असे कडक नियम होते. या नियमांनुसार वागले नाही तर त्यांना चांगली मोठी शिक्षा होत असे.

हे सारे बघून तुलसीदासांचे मन कळवळले. अस्पृश्यांविषयी त्यांच्यात दयाबुद्धी निर्माण झाली. त्यांच्या परिस्थितीत सुधारणा व्हावी असे त्यांना वाटू लागले. गंगा घाटावर त्यांनी आपली

बैठक मारली. प्रभू रामचंद्राच्या लीला ते आपल्या कवितातून करू लागले. रामचरितावर रोज तिथे आख्यान लावू लागले. त्यांची प्रेमळ रसाळ वाणी लोकांना आवडू लागली. लोक रोज मोठ्या संख्येने तुलसीदासांचे भजन, कीर्तन ऐकण्यास हजेरी लावू लागले.

तुलसीदास आता पूर्वीचा खोड्या काढणारा, मुलांना, वृद्धांना त्रास देणारा राहिला नव्हता. त्याच्यात आता आमूलाग्र बदल झाला होता. त्याला खोडकर मुलाविषयी, वृद्ध माणसाविषयी काळजी वाटत होती. मुलांनी चांगल्या मार्गाला लागावे म्हणून तो प्रयत्न करत होता. राम कथेतून लोकांचे रंजन करत होता आणि त्यातून परमेश्वर भक्ती वाढवत होता. तुलसीदास आता संत तुलसीदास म्हणून ओळखला जाऊ लागला. अस्पृश्यांसाठी त्याने आपला भक्तीधर्म खुला केला. त्यांनी रामकथा ऐकावी. रामभजन करावे. यासाठी त्याचे प्रयत्न होते. अस्पृश्य त्याचे भजन कीर्तन ऐकायला येत. त्यामुळे त्यांच्यात अपेक्षित बदल घडू लागले. त्यामुळे तुलसीदासाला आनंद होत असे. इतरांबरोबर अस्पृश्यांनी बसावे, बोलावे हे तुलसीदासांना हवे होते. कारण सर्व माणसे एकाच परमेश्वराने निर्माण केली आहेत तर मग भेदभाव कशासाठी ?

तुलसीदासांच्या कथा कीर्तनास भाविकांची गर्दी वाढत होती. रामकथा सादर करत असताना तुलसीदास अगदी रंगून जात. देहभान हरपत. त्यांचा स्नेहभाव, त्यांची विचारधारा, त्यांची भक्ती, त्यांचा लडिवाळपणा हे सगळे रसभाव त्यावेळी एकवटत असत. श्रोतेही त्यात इतके रंगून जात की त्यांनाही स्थळकाळाचं भान उरत नसे. रामकथा सांगण्याची तुलसीदासांची हातोटी विलक्षण होती. त्यामुळे तुलसीदासांची कीर्ती रोज मैल, मैल पसरत होती.

कुत्सित बुद्धीच्या लोकांना ते सहन होईना. तुलसीदासांची कीर्ती त्यांच्या डोळ्यात सलू लागली. त्या लोकांनी तुलसीदासांची निंदा नालस्ती करणे सुरू केले. ते गंगा घाटावर तुलसीदासांना त्रास देऊ लागले. गंगा घाटावर त्यांनी तुलसीदासांना रामकथा सांगण्यास मज्जाव केला. एवढे करून ते थांबले नाहीत तर त्यांनी तुलसीदासांच्या घरच्या लोकांनाही त्रास द्यायला सुरुवात केली. त्यामुळे घरचे नातलग तुलसीदासास रागवत. त्याने काही कामधंदा करावा, प्रपंच करावा, आपले घरदार चालवावे म्हणून घरच्या लोकांनीही तुलसीदासांना त्रास द्यायला सुरुवात केली.

तुलसीदास सच्चे रामभक्त होते. त्यांच्या लक्षात आले, आता येथे घरात राहणे अवघड आहे. आपल्याला पण आणि घरच्यांना पण. यावर आता एकच उपाय होता म्हणजे घर सोडणे. आणि त्यांनी तेच केले. त्यांनी घरदार, नातलग यांचा त्याग केला आणि प्रभू रामाच्या भरवशावर ते गंगा घाटावर राहू लागले. आता ते स्वतंत्र होते. भिक्षा मागून पोट भरायचे. थोडे फार लेखन करायचे आणि संध्याकाळी रामकथा गायची हा त्यांचा दिनक्रम सुरू झाला.

तुलसीदासांना नेहमी इतर गावातूनही रामकथा गायला आमंत्रणे येत असत. त्यामुळे तुलसीदासांना परगावीही रामकथा सांगायला जावे लागत असे. त्यांचा प्रवास कधी घनदाट

जंगलातून होत असे तर कधी गंगामैय्या पार करून नावेतून पैलतीरी जावे लागे. प्रवासास जाताना ते एकटे जात असत. मुखी रामनाम असल्याने त्यांना कुणाचे भय नव्हते. कुटाळ लोक त्यांना त्रास द्यायचे; पण ते तिकडे फारसे लक्ष देत नसत.

एकदा असेच ते रामकथा सांगण्यासाठी पैलतीरी जाणार होते. नावेत बसून गंगामैय्या पार करून जायचे होते. इतर सहप्रवाशांबरोबर ते नावेत बसले. नावेतही ते रामाविषयीच सहप्रवाशांशी बोलत होते. काही टवाळखोरही नावेत होते. त्यांना रामकथा वगैरे थोतांड वाटत असे.

त्यांनी तुलसीदासांशी वाद घालायला सुरुवात केली. ''सारखं राम-राम काय करतोस ? बाकीच्या गोष्टी बोल काहीतरी ?''

तुलसीदास त्यांना म्हणाले, ''अरे बाबानो रामनामाची गोडी रामनाम घेतल्यावरच कळणार. तुम्हीही रामनाम घ्या आणि उद्धरून जा.''

''मोठा आला आहे आम्हाला सांगणारा रामनाम घ्या म्हणून. तू घेतोस तर तू उद्धरून जा'' म्हणून त्यांनी तुलसीदासांना गंगेत ढकलून दिले.

तुलसीदास पट्टीचे पोहणारे होते. ते पोहत नावेकडे येऊ लागले; पण त्या कुटाळांनी नावाड्यास ढकलून वल्ही आपल्या हातात घेतली आणि आपण नाव वल्हवू लागले; पण त्यांना कुठे नाव चालवायला येत होती ! नाव भरकटत, भरकटत निघाली. प्रवासी घाबरले. जिवाच्या आकांताने ओरडू लागले. कुटाळांना नाव आवरेना आणि ती उलटी झाली. सगळेच गंगेत पडले. कुटाळांना काही पोहता येत नव्हते. नावाड्यांना ढकलल्यामुळे ते नदीत पडले होते आणि तुलसीदास पोहत होतेच. त्यांनी या प्रवाशांना एक-एक करून किनाऱ्यावर आणले. त्यात कुटाळही होते. त्यांना केवळ तुलसीदासांनी जीवदान दिले होते.

किनाऱ्यावर आल्यावर इतर प्रवाशांनी त्यांना चांगलेच फैलावर घेतले. त्यांना तर आता मेल्याहून मेल्यासारखे झाले होते. काही बोलायला त्यांच्याकडे शब्दच उरले नव्हते. त्यांनी सहप्रवाशांची, नावाड्याची आणि तुलसीदासांची क्षमा मागितली. पुन्हा असे दुष्ट प्रकार कधीही करणार नाही अशी त्यांनी शपथ घेतली. रामनामामुळे तुम्ही वाचलात हे त्या कुटाळांना अगदी आवर्जून सांगितले. ते कुटाळ तुलसीदासांना शरण गेले आणि त्यांनी तुलसीदासांना सांगितले की आजपासून आम्ही तुमच्या रामकथा सांगत असताना तुम्हाला साथ करू. हा सोमदेव चिपळ्या वाजवेल आणि मी डफ वाजवेन. एकतारीवर तुम्ही आणि ते सोमदेव आणि सुखदेव त्या दिवसापासून तुलसीदासांबरोबर राहू लागले. त्यांच्या संगतीने त्या कुटाळांचा दुर्जनपणा केव्हाच लयास गेला.

अशाच आणखी एका प्रसंगाने तुलसीदासांचे कर्तृत्व उजळून निघाले. त्यांना गंगा घाटावर बसायला, रामकथा गायला ब्रह्मवृंदांनी मज्जाव केला होता. त्यामुळे तुलसीदास गंगा किनाऱ्यावर

पण ओसाड अशा ठिकाणी बसून रामकथा गाऊ लागले. तेथे लोक जाऊ लागले. इकडे गंगा घाट अगदी सुना सुना झाला. भाविकांबरोबर एक गाय तेथे तुलसीदासांची रामकथा ऐकायला येत असे. ती रोज न चुकता अगदी वेळेवर हजर असायची. लोकांना मोठे कुतूहल वाटायचे. या गाईला एवढे काय कळते ? तुलसीदास तिला रोज वंदन करून रामकथेस सुरुवात करीत. नंतर, नंतर ती गाय तुलसीदासांजवळच राहू लागली. तिला कितीही घालवले तरी ती जाईना. मग तुलसीदास तिला आपल्या अन्नातील थोडे अन्न देत असत. ती अगदी सावलीसारखी त्यांच्याबरोबर असे. त्यामुळे तुलसीदासांना तिचा अगदी लळा लागला. आता तिच्याशिवाय त्यांना करमत नसे. ते जेथे जातील तेथे ती गाय असे. तुलसीदास तिला माँ म्हणूनच हाक मारत. तिला सांभाळत.

रात्री रामकथा झाल्यानंतर तुलसीदास निजले होते. दिवसभराच्या दगदगीमुळे त्यांना अगदी गाढ झोप लागली होती. सगळीकडे अगदी शांतता होती. गाय पण तुलसीदासांच्या पायाशी बसून होती. ती मात्र टक्क जागी होती. बाजूच्या झुडपातून खूसखूस आवाज आला तशी गाईनं कान टवकारले आणि तिनं हंबरायला सुरुवात केली. एक भला मोठा नाग त्या झुडपातून सळसळत बाहेर आला आणि तुलसीदासांच्या रोखाने निघाला. गाईने ते पाहिले आणि तिने आणखी जोरजोराने हंबरायला सुरुवात केली. तिच्या जोराच्या आणि सातत्याच्या हंबरण्याने आजूबाजूच्या लोकांना जाग आली. गाय अजून हंबरत होतीच आणि तुलसीदास मात्र गाढ झोपले होते.

'काय झाले' म्हणून लोक काठ्या घेऊन धावत आले. लोक जमलेले, त्यांचा आरडाओरडा आता तुलसीदासांना जाग आली. ते ताडकन् उठले आणि त्यांच्यासमोर फणा काढून नाग उभा होता. तो सर्वांनी पाहिला. लोक त्याला मारायला धावले. तुलसीदास मात्र तसेच निश्चल उभे होते. त्यांनी लोकांना थोपवले. त्या अजस्त्र नागाने आपला फणा तुलसीदासांच्या पायावर तीन वेळा आपटला आणि तो आल्या वाटेने सळसळत निघून गेला. गाय आता हंबरायची थांबली होती. लोकांनी नि:श्वास टाकले. एक भयंकर संकट टळले होते; पण ते संकट होते का नव्हते याबद्दल मात्र लोक संभ्रमात होते. कारण नागाने कुणालाही इजा केली नाही. त्याने तुलसीदासांना वंदन केले होते, तेसुद्धा त्रिवार आणि तो निघून गेला होता. दैवाची लीला. यामुळे तुलसीदासांचा मान मात्र वाढला. लोकांनी एकवार तुलसी-रामाचा जयजयकार केला आणि ती गाय स्वस्थ झाली.

तुलसीदासाने धर्म बिघडवला, समाज बिघडवला म्हणून उच्चवर्णियांनी त्याच्यावर, त्याच्या घरादारावर बहिष्कार टाकला होता; पण ते मूठभर उच्चवर्णीय. त्यांच्या नियमास समाजाने भीक घातली नाही. उलट त्यांनी तुलसीदासांना त्यांच्या नातलगांना कायम आधार दिला. दिवसेन् दिवस तुलसीदासांचे महत्त्व वाढतच होते आणि उच्चभ्रूंचा जळफळाट होत होता. या उच्चभ्रूंनी एक नवा घाट घातला की काहीही करून तुलसीला संपवायचे; पण याचा कुणास पत्ता लागू द्यायचा नाही. परस्पर सगळे व्हायला पाहिजे.